# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : ३/१२/२०१८

**आलोसे निलेश मोतीराम बाविस्कर, सहायक मिळकत व्यवस्थापक, नेमणुक सिन्नर नगर परिषद सिन्नर, जि.नाशिक यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये लाच मागणी केल्याने गुन्हा दाखल केले बाबत.**

---

यातील तक्रारदार यांचा मंडप व लाईट डेकोरेशनचा व्यवसाय असून त्यांना फटाके स्टॉलसाठी तात्पुरत्या बांधलेल्या ४२ गाळयांना विदयुत पुरवठा मिळणे कामी नगरपरिषद सिन्नर येथील ना हरकत दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी नगरपरिषद सिन्नर येथे अर्ज केला होता. सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार हे आलोसे निलेश मोतीराम बाविस्कर सहायक मिळकत व्यवस्थापक सिन्नर नगरपरिषद सिन्नर, जि. नाशिक यांना नगरपरिषद सिन्नर येथील कार्यालयात भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे ना हरकत दाखला देण्याकरीता ४२ गाळयाचे प्रत्येकी १००/–रुपये याप्रमाणे एकुण ४,२००/– रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दिनांक ३०/१०/२०१८ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाचे सापळापुर्व पडताळणी दरम्यान आलोसे निलेश मोतीराम बाविस्कर सहायक मिळकत व्यवस्थापक सिन्नर नगरपरिषद, जि. नाशिक यांनी ना हरकत दाखला देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ४,२००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द आज दिनांक ३/१२/२०१८ रोजी सिन्नर पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (सुधारीत सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४–२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता